**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0828 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/11/2022 00:27

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 31/10/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/10/2022

**Time From (वेळेपासून):** 16:42 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/11/2022 **Time (वेळ):** 00:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/11/2022 00:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रा शिक्षणाधिकारी कक्ष, , प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा,सोलापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गणेश दामोदर निळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो कोंडी ,ता उत्तर सोलापूर, सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो कोंडी ,ता उत्तर सोलापूर, सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किरण अनंत लोहार | | | 1. प्राथमिक शिक्षणाधिकारी,, प्राथमिक शिक्षण विभाग,जिल्हा , सोलापुर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 31.10.2022

मी गणेश दामोदर निळ, वय 37 वर्षे, व्यवसाय - शेती व शिक्षण संस्थाचालक रा. मु.पो. कोंडी ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर मो.क्रं. 9850284328, समक्ष फिर्यादी जबाब देतो की,

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास असुन मी शेती व्यवसाय करुन आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. तसेच सोलापूर जिल्हयातील कोंडी येथे राजर्षी शाहू महाराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचा संस्थापक व अध्यक्ष आहे.

आमचे राजर्षी शाहू महाराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय कोंडी येथे इयत्ता 01 ली ते 10 वी पावेतो वर्ग चालु असुन त्यापैकी इयत्ता 8वी, ते 10 वी पावेतोचे वर्ग हे शिक्षण विभागातीले यु -डायस प्लस या ऑनलाईन प्रणाली मध्ये जोडण्यात आले नसल्याने सदरची इयत्ता ही यु -डायस पल्स मध्ये जोडण्याकरीता आमचे शाळेतील मुख्याध्यापक सुषमा गणेश निळ यांच्या सहीने सर्व कागदपत्रांसह मा. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर यांना दि. 10/05/2022 रोजी अर्ज सादर केला होता. सदर अर्जाचा मी अध्यक्ष या नात्याने पाठपुरावा करीत आहे.

सदरचा अर्ज पुढील कार्यवाही होणेकरीता मा. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर यांनी त्यांच्या शिफारसपत्रासह त्यांच्याकडील जा.क्रं. 554/2022 दि. 20/05/2022 अन्वये मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि. प. सोलापूर यांच्याकडे सादर केला. त्यानंतर मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांच्याकडुन आवश्यक कागदपत्रंाच्या अनुषंगाने तपासणी करुन यु -डायस प्लस मध्ये जोडणी करणेबाबत मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे विभाग पुणे यांच्याकडे मंजुर करीता पाठविले जाते व मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे विभाग यांच्याकडुन मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदरचे वर्ग हे मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांच्याकडुन यु -डायस प्लस या ऑनलाईन प्रणाली मध्ये जोडण्यात येतात. त्याअनुषंगाने मी मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) कार्यालय येथे पाठपुरावा करुन त्यांच्याकडुन काढण्यात आलेल्या सर्व त्रुटींची वेळोवेळी पुर्तता केली तरी देखील आमच्या अर्जावर पुढील कार्यवाही होत नसल्याने मी दि.28/10/2022 रोजी मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) किरण लोहार यांची भेट घेवुन सर्व त्रुटींची पुर्तता केली असल्याबाबत सांगीतले असता लोहार साहेबांनी "नुसते त्रुटींची पुर्तता करुन होत नसते" असे म्हणाले त्यावर मी त्यांना मला समजले नसल्याचे सांगीतले असता त्यांनी मला 50,000/- रुपये करा असे सांगीतले. त्यावर मी त्यांना शाळेशी संबधीत इतरांशी बोलुन कळवितो असे सांगीतले. त्यावर त्यांनी मला ठिक आहे पण तुम्ही एकटयानेच या असे सांगीतले.

तरी शाळेतील वर्ग हे शिक्षण विभागातील यु -डायस प्लस या ऑनलाईन प्रणाली मध्ये जोडण्याकरीता आवश्यक मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे विभाग यांची मंजुरी घेणेकरीता तसेच मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ते यु -डायस प्लस या ऑनलाईन प्रणालीस जोडण्याकरीता कोणालाही कोणतीही रक्कम द्यावी लागत नाही तसेच मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) किरण लोहार हे मागणी करीत असलेले 50,000/- रुपये ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री असुन मला त्यांना कोणतीही लाच दयायची इच्छा नाही. माझा त्यांचेशी यापुर्वीचा कोणताही खाजगी पैशाचा देण्या घेण्याचा व्यवहार प्रलंबित नसुन शिक्षणधिकारी (प्राथ.) किरण लोहार यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती अशी विनंती करुन श्री. उमाकांत महाडिक, पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर यांच्या समक्ष हजर राहुन लेखी तक्रार नोंदवली.

मी दिलेल्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी पोनि महाडिक, यांनी मा. आयुक्त साो, सोलापूर महानगर पालीका सोलापूर येथील 1) निलोबा सिरसट व 2) रामप्रसाद बेंजरपे असे 02 शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व सदर पंचाची तसेच माझी आपसात ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी पुन्हा पंचांसमक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी मी त्यांच्याकडे दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर दोन्ही पंचांनी व पोनि महाडिक यांनी वाचून सह्या केल्या. त्यानंतर पोनि

बाहेरच उभे राहीले. मी लोहार यांच्या कक्षाच्या आत जावुन सर असे म्हणालो असता लोहार यांनी पैसे मागणीचा हाताने इशारा केला त्यावर मी माझ्या शर्टच्या वरच्या खिशात ठेवण्यात आलेली लाच रक्कम 25,000/- रुपये काढुन लोहार यांच्या समोर धरुन पंचवीस असे सांगीतले त्यावर लोहार यांनी सदरची लाच रक्कम त्यांच्या डाव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी मी लोहार यांना आज होईल का असे विचारले असता त्यावर लोहार यांनी मला डायरेक्ट आता माझ्याकड ययच असे सांगीतले त्यावर मी हो चालेल सर असे म्हणालो त्यावर लोहार यांनी मला बाहेर कुठकाय म्हणू नको असे बजाविले त्यावर मी त्यांना नाही सर असे म्हणालो त्यानंतर लोहार यांनी मला त्यांच्या कार्यालयातील लिपिक पटेल यांना बोलाविण्यास सांगीतले त्यावर मी हो ठिकाय असे म्हणुन लोहार यांच्या कक्षाचा दरवाजा उघडुन बाहेर आलो व तेथे बाहेरच असलेल्या लिपिक पटेल यांना बोलत पोनि महाडिक व सापळा पथकास दिसेल आशा पध्दतीने नियोजीत इशारा केला त्यावेळी मी केलेल्या इशा-यावरून सापळा पथकातील अधिकारी, पंच व कर्मचारी असे लोहार यांच्या कक्षात येवुन प्रा. शिक्षणाधिकारी लोहार यांना त्यांच्या कक्षात 17:47 वा. चे सुमारास रंगेहात पकडले. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन पंच नं. 02 शिरसट यांनी लोहार यांना लाचेची रक्कम 25,000/- रुपये बाबत विचारले असता लोहार यांनी त्यांच्या नेसते पॅन्टच्या डावेबाजुच्या खिशातुन लाचेची रक्कम काढुन पोनि महाडिक यांच्या समोर धरली. सदरची रक्कम पोनि महाडिक यांच्या सुचनेवरुन पंच नं. 02 शिरसट यांनी ताब्यात घेवुन यापुर्वी नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. त्यानंतर लोहार यांचेसमक्ष त्यांचे कक्षामध्ये कृत्रिम अंधार करुन सदर नोटा तसेच लोहार यांचे हात व त्यांची नेसती पॅन्ट अँ.वा. दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर, लोहार यांच्या डाव्या हातावर व नेसते पॅन्टच्या डावे बाजुच्या खिशाच्या तोंडावर तसेच आतमध्ये अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. सदरच्या नोटा पुराव्याकामी पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन पंच शिरसट यांनी ताब्यात घेतली. त्यानंतर पोनि महाडिक यांनी दोन्ही पंच व सापळा पथकासमक्ष लोहार यांना त्यांचे नाव गाव याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव किरण अनंत लोहार, वय 49 वर्षे, पद- शिक्षणाधिकरी प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परीषद सोलापूर, मुळ रा. घर नं. सी 2, शिक्षक कॉलनी पाचगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर सद्या रा. द्वारा/ अतुल राजपुत यांचे घरी भाडयाने नेहरुनगर व्दारकानगरी सोलापूर जि. सोलापूर असे सांगितले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी माझे कामाचे अनुषंगाने असलेले मुळ कागदपत्राची विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या टेबलवर असलेले सदरचे कागदपत्र उचलुन पोनि महाडिक यांना दिले सदरचे कागदपत्रे पोनि महाडिक यांनी ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी प्रा. शिक्षणाधिकारी लोहार यांना पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेत असल्याचे मला व दोन्ही पंचांना सांगितले. त्यानंतर मी व पोनि कोळी असे माझ्या दुचाकी वाहनावरुन व पोनि महाडिक, दोन्ही पंच, प्रा. शिक्षणाधिकारी लोहार व सापळा पथक असे शासकीय वाहनाने अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात आलो व सदरबाबत सविस्तर पडताळणी व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात दि.31.10.2022 रोजी पूर्ण करण्यात आली.

तरी दिनांक 31.10.2022 रोजी 16.42 वा ते 17.47 वा. च्या दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. किरण अनंत लोहार, प्राथमिक शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परीषद सोलापूर, यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे खेरीज लाच म्हणून आमचे राजश्री शाहू महाराज, प्राथमिक व माध्यमिक विद्यालय कोंडी येथील इयत्ता 8 वी ते 10 चे वर्ग शिक्षण विभागातील यु -डायस प्लस या ऑनलाईन प्रणाली मध्ये जोडण्याकरीता आवश्यक मा. शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे विभाग यांची मंजुरी घेणेकरीता तसेच मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ते यु -डायस प्लस या ऑनलाईन प्रणालीस जोडण्याकरीता प्रा. शिक्षणाधिकारी कक्षामध्ये माझ्याकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 25,000/- रुपयांची मागणी करुन सदर लाच रक्कम 25,000/- रूपये प्रा. शिक्षणाधिकारी कक्ष, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हापरीषद सोलापूर येथे स्वत: स्विकारून सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक किरण अनंत लोहार, पद- प्रा. शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परीषद सोलापूर, यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ashwini Shamrao Bhosale(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

फिर्याद प्रत मिळाली
1/11/2022

पोलीस ठाणे अंमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ashwini Shamrao Bh
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):